दि० 17.03.2022

**शिक्षण विभाग जिल्हा परिषद,बीड अंतर्गत कंत्राटी तत्वावर डाटा एँन्ट्री ऑपरेटर भरती प्रक्रिये बाबतच्या सुचना**

१. दिनांक १०/०२/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या प्राथमिक अर्हता पात्र / अपात्र यादी नुसार दिनांक १०/०२/२०२२ ते १७/०२/२०२२ सायं ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटी वगळता) आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयास प्राप्त झालेल्या आक्षेपांच्या अनुपंगाने अंतिम अर्हता पुर्ण करणाऱ्या उमेदवारांची गुणवत्ता यादी याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.
२. सदर भरती प्रक्रियेसाठी गुणवत्ते नुसार एकुण ४५ उमेदवरांची संगणक प्रात्यक्षिक परिक्षा दिनांक ०४/०४/२०२२ रोजी दुपारी ०३ ते ४.०० या वेळेत शासकीय तंत्रनिकेतन,बीड येथे आयोजित केलेली आहे.
३. सदरील परिक्षा हि संगणकावर (कॉम्प्युटरवर) घेतली जाणार आहे.
४. सदर परिक्षा MS WORD,POWARPOINT,EXCEL,इंटरनेट व इतर संगणकाशी सबंधित ज्ञानावर अधारित विषयावर 100 गुणांची असेल.
५. या परिक्षे मध्ये ज्या उमेदवारांना किमान 50 टक्के गुण प्राप्त होतील तेच उमेदवार पुढील निवड प्रक्रियेच्या टप्प्यासाठी पात्र राहतील.
६. प्रत्येक उमेदवारांना स्वत:चा ईमेल आयडी असणे अनिवार्य आहे. सदरील ईमेल वरुन आपण केलेले प्रात्यक्षिक ईमेल व्दारे या कार्यालयाच्या mdmbeed@gmail.com या ईमेल वर पाठविणे आवश्यक आहे.
७. संगणक प्रात्यक्षिक परिक्षेसाठी ISM V6 मध्ये Typewriter Marathi किंवा Remington Marathi Key board चा वापर करुन संगणक प्रात्यक्षिक घेण्यात येईल.
८. सदरील परिक्षा केंद्रात प्रवेश करताना कॅलक्युलेटर,मोबाईल फोन,स्मार्ट वॉच वापरण्यास सक्त मनाई आहे.
९. ज्या उमेदवारांना ईमेलव्दारे प्रवेश पत्र विहित वेळेत मिळाले नसेल तर अशा उमेदवाराने स्वत:चा ओळखीचा पुरावा (आधार कार्ड,पॅन कार्ड,बँक पासबुक इ.) दाखवून परिक्षा दिनांकाच्या दिवशी परिक्षा केंद्रावर एक तास अगोदर येवून प्रवेश पत्र हस्तगत करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल.
१०. प्रवेशपत्र व परिक्षे सबंधित सुचना www.zpbeed.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.
११. कोव्हिड संसर्गाच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांने शासनाच्या सर्व सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
१२. उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही स्वरुपाच्या दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेचा कोणत्याही टप्प्यावर बाद (अपात्र) केले जाईल.
१३. सदर भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक बदल करण्याचा अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांनी राखुन ठेवले आहेत

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद,बीड

अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,बीड

Scanned by CamScanner